# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १० जुलै, २०१२
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय.**

**दोन : प्रश्नोत्तरे-**

**अ) तारांकित प्रश्न.**

**ब) सोमवार, दिनांक ९ जुलै, २०१२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**चार : लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"कोल्हापूर येथील श्री शंकराचार्य करवीर पीठ या संस्थानाच्या हजारो एकर जमिनी नियमबाह्यरित्या हस्तांतरीत केल्याप्रकरणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य सचिव यांच्याकडे सन 2010 मध्ये वा त्यासुमारास लेखी तक्रार करणे, नियमांचे उल्लंघन करुन जमिनी हस्तांतरण केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सन 2009-10 दरम्यान चौकशीचे आदेश देणे, राधानगरी, गडहिंग्लज करवीर या तालुक्यामध्ये जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण झाल्याची बाब चौकशीत आढळून येणे, परंतु अद्याप तद्नुसार संस्थानास जमिनी परत देण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, तसेच बेकायदेशीर जमीन हस्तांतरण करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई झालेली नसणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व उपायोजना."

(२) **श्री. परशुराम उपरकर, डॉ. निलम गोऱ्हे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"सिंधुदूर्ग जिल्ह्यात अनेक वाड्यांमध्ये माहे एप्रिल, 2012 पासून निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई, जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सुमारे 267.15 लाख रूपये खर्चाच्या पाणी टंचाई निवारण आराखडयाला दिलेली मंजूरी,

कामनादेवी कॅनलच्या दुरूस्ती अभावी ओरोस येथे निर्माण झालेला पाणी टंचाई, मालवण तालुक्यात मागणी करण्यात येऊनही विंधन विहिरी मंजूर न होणे, सावंतवाडी तालुक्यातील 32 वाड्यांकरिता समारे 28 लाखांचा टंचाई आराखडा ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने जिल्हाधिकारी यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविणे, कलंबिस्त, सांगेली, कुडतरकरटेंब, शेर्ले, आरोसबाग येथे राष्ट्रीय पेयजल योजनेतून पाणीपुरवठा योजना प्रस्तावित असणे, तसेच कारिवडे, नेमळेतील पाणी टंचाई निवारणासाठी विंधन विहिरी प्रस्तावित असणे, अशा विविध योजना जिल्ह्यात मंजूर असूनही योग्य नियोजनाभावी जिल्ह्यात दरवर्षी पावसाचे प्रमाण जास्त असूनही निर्माण होणाऱ्या या पाणीटंचाईमुळे तेथील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(३) **श्री. मोहन जोशी, डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"शासनाच्या औंध येथील शासकीय रुग्णालयातील सुमारे 1.31 कोटी रुपये खर्च करुन अद्ययावत करण्यात आलेला जळीत रुग्ण वॉर्ड रिकामा पडून असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, दिनांक 26 मे, 2012 च्या सुमारास मेडिपॉईंट रुग्णालयास लागलेल्या भीषण आगीमध्ये गंभीर दुखापती झालेल्या 36 रुग्णांना या 2 किलोमीटर अंतरावरील रुग्णालयात न हलवता 12 किलोमीटर अंतरावरील ससून रुग्णालयात दाखल केले जाणे, औंध रुग्णालय 400 खाटांचे असून वॉर्ड नं.106 हा केवळ जळीत रुग्णासांठी राखीव ठेवला गेला असणे, जळीत रुग्णांच्या औषधोपचारासाठी सर्व अद्ययावत सामुग्री खरेदी केलेली असूनही केवळ वापरविना असल्यामुळे सुमारे 2 डझनहून अधिक नव्या कोऱ्या खाटा उन्हा-पावसात रुग्णालयाच्या छतावर भंगारात टाकून देण्यात येणे, परिणामी पुणे परिसरातील जनतेत पसरलेली तीव्र नाराजीची भावना, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री. जयवंतराव जाधव, अनिल भोसले, रमेश शेंडगे, हेमंत टकले, अरुण गुजराथी, सतीश चव्हाण, दिपकराव साळुंखे, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्याचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सुकन्या ही योजना राबविण्याबाबत शासनाचा असलेल्या प्रस्ताव, या योजनेसाठी सुमारे 500 कोटी रूपये खर्च प्रत्येक वर्षी अपेक्षित असणे,

मुलगी जन्मल्याबरोबर तीच्या नावाने बँकेत अथवा विमा कंपनीकडे विशिष्ट रक्कम जमा करून मुलगी 18 वर्षाची झाल्यानंतर तीला 1 लाख रुपये पुढील शिक्षणासाठी उपलब्ध करून देणेबाबत ही योजना असणे, मात्र ही योजना स्थगित करण्याचा शासनाने नुकताच घेतलेला निर्णय, राज्यातील मुलींचे प्रमाण कमी होत असलेच्या पार्श्वभूमीवर ही योजना तातडीने सुरू करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : विशेष उल्लेख सूचना - असल्यास -**

**दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर**

## ***दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत***

**सहा : शासकीय विधेयक :-**

**पुर:स्थापनार्थ -**

**सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१२.**

**सात : सर्वश्री. हेमंत टकले व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव-**

"राज्यातील बऱ्याच भागात सुरूवातीला पाऊस पडल्यानंतर शेतकऱ्यांनी पेरणीला केलेली सुरूवात, त्यानंतर पावसाने दडी मारल्याने निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांनी १५ लाख हेक्टरवर सुमारे ४५० कोटी रुपयांची बियाणे व खते खरेदी करुन पेरणी करणे, परंतु आता पिके करपल्यामुळे दुबार पेरणीचे संकट ओढवलेले संकट दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना बँकेमार्फत कर्ज पुरवठा न होणे, परिणामी शेतकऱ्यांना सावकाराकडून जास्त व्याज दराने कर्ज घ्यावे लागणे, शेतीचा वाढलेला खर्च, अपुऱ्या पावसामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेदिवस कमी होणे, राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली तीव्र टंचाई, विदर्भात ४३०० गावांना भीषण पाणीटंचाई निर्माण होणे, पिण्याच्या पाण्यासाठी महिलांनी मोर्चे काढून निदर्शने करणे, गुरांच्या चाऱ्याचा व त्यांच्या पिण्याच्या पाण्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, शासनाने ठिकठिकाणी चारा डेपो उघडणे, परंतु तेथे होत असलेला भ्रष्टाचारामुळे व चाऱ्याअभावी शेतकऱ्यांना त्यांची जनावरे कमी दराने विकावी लागणे, गावांत रोजगार मिळत नसल्यामुळे राज्यातील

शेतकरी विशेषतः विदर्भातील शेतकरी मुंबई, ठाणे, नवी मुंबई येथे कुटुंबियांसह स्थलांतरित होणे, दुष्काळाचा सामना करण्यासाठी राज्यात शेततळी निर्माण करण्याची तसेच अवर्षणप्रवण भागात जलसंधारणाच्या कामांना गती देण्याची नितांत आवश्यकता, राज्यात दुष्काळी महामंडळाची स्थापना होऊन अद्यापी त्या मंडळाला निधी देण्यात आला नसल्याने मंडळाचे काम ठप्प होणे, केंद्र शासनाची असलेली आर.आर.आर.योजना राज्यात राबविण्याबाबत शासनाकडून होत असलेला विलंब, त्यामुळे १९७२ सालच्या पाझर तलावाच्या दुरूस्तीचा निधी उपलब्ध न होणे, प्रलंबित असलेला निधी व त्यानंतरच्या कोल्हापूर टाईप बंधारे व पाझर तलावांच्या दुरूस्तीचा निधी मिळण्याची आवश्यकता, दुष्काळ जाहिर करुन शेतकऱ्यांच्या शेतीमालास योग्य बाजारपेठ व भाव मिळणेबाबत तसेच विविध वित्तीय संस्था व बँकाकडून कर्ज पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

**आठ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी)**

**(१) श्री.विक्रम काळे, वि.प.स.**

"वाढीव/अतिरिक्त तुकड्यांना गेल्या ७/८ वर्षात शासनाने मान्यता न दिल्याबाबत" या विषयावरील श्री.रामनाथ मोते, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.नागो गाणार, डॉ.रणजित पाटील, श्री.वसंतराव खोटरे, प्रा.दिलीपराव सोनावणे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री. दिपकराव साळुंखे, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. तसेच श्री.संजय केळकर, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक २६३८५ ला दिनांक १९ मार्च, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील."

**(२) श्री.विक्रम काळे, वि.प.स.**

"राज्यातील महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही" या विषयावरील श्री.सुभाष चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजन तेली, श्री.अमरानाथ राजूरकर, प्रा.सुरेश नवले, डॉ.दिपक सावंत, श्री.परशुराम उपरकर, श्री.रामनाथ मोते, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो गाणार, श्री.किरण पावसकर, श्री.रमेश शेंडगे, श्री.हेमंत टकले, श्रीमती उषाताई दराडे, श्री.विक्रम काळे,

श्रीमती विद्या चव्हाण, श्री.एम.एम.शेख, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स. तसेच श्री.संजय केळकर, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक २६०३३ ला दिनांक १९ मार्च, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

| | |
|---|---|
| **विधान भवन,** | **डॉ.अनंत कळसे,** |
| मुंबई, | प्रधान सचिव, |
| दिनांक : ९ जुलै, २०१२. | महाराष्ट्र विधानपरिषद. |